# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १७०/२००८/ दिनांक :

१) सौ. सुशिला पावलू सोज,
२१/२४४, व्यंकटेशनगर, अर्जदार
इचलकरंजी ४१६ ११५
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा
नोडल ऑफीसर, म.रा.वि.वितरण कं.लि.,
संवसु मंड्ल कार्यालय, ताराबाई पार्क,
कोल्हापूर.

२) कार्यकारी अभियंता(संवसु)
म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित. विरूध्द पक्षकार
सं.व सु विभाग,
इचलकरंजी, जि. कोल्हापूर.

_३) उपकार्यकारी अभियंता (संवसु).
म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.
संवसु इचलकरंजी ' ब ' उपविभाग,

इचलकरंजी, जि. कोल्हापूर.

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित तर्फे

**कोरम :–** १) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य–सचिव

२) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग

(ग्राहक तक्रार निवारण मंच)

विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार



170 of 2008

सुशिला पावलू सोज यांचे २१/२४४ व्यंकटेशनगर, इचलकरंजी येथे १९९७ पासून ग्राहक क्रमांक २५०३८०१७७०४४ यंत्रमाग वीज जोडणी आहे. सदर जोडणीचा भार सुरूवातीस २० अश्वशक्ती होता तो त्यांचे मागणीनुसार ४५ अश्वशक्ती मंजूर होऊन मे २००५ पासून वाढवून ६५ अश्वशक्ती केला. मुख्य कार्यालयाचे परिपत्रकानुसार मागील वर्षी २००४ चे तुलनेत २००५ मध्ये वीज वापर जास्त झाला असलेमुळे त्यास लोड मॅनेजमेंट चार्जेस लादणेत आले आहेत. त्या बाबत त्यांनी अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूरकडे विहित नमुन्यात तक्रार दाखल केली. त्या कामी कक्षाने आदेश क्र. ४२२३ दिनांक २२–५–२००८ ने निर्णय दिला आहे. सदर निर्णय मान्य नसलेमुळे तक्रारदार यांनी प्रतिनिधीमार्फत ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूरकडे दिनांक २९–५–२००८ ला अपील दाखल केले आहे. त्यानुसार मंचाने कार्यवाही सुरू केली. संबंधित अधिकाऱ्याकडून मुद्देनिहाय माहिती मागविली व सुनावणी दि. ३–७–२००८ रोजी दुपारी १२.०० वाजता विभागीय कार्यालय, इचलकरंजी येथे ठेवण्यात आली.

सदर सुनावणीचेवेळी कार्यकारी अभियंता, नोडल अधिकारी , कोल्हापूर मंडल व कार्यकारी अभियंता, इचलकरंजी विभाग हे अनुपस्थित होते. तर ग्राहकाचे वतीने प्रतिनिधी पावलू मोती सोज, एस.ए. कोळी, उप कार्यकारी अभियंता, इचलकरंजी विभाग, एस.एस. शिंदे ‘ ब ‘ शहर उप विभाग, इचलकरंजी, एस.बी. जोशी, विभागीय लेखापाल, इचलकरंजी विभाग हे उपस्थित होते.

अर्जदाराचे प्रतिनिधीने तक्रारीचे स्वरूप व म्हणणे खालील प्रमाणे मांडले.

मोतीराम बाळू सोज यांचे नांवे अंदाजे सन १९९७ पासून व्यंकटेशनगर २१/२४४ इचलकरंजी येथे १५ एच.पी. यंत्रमागा करिता वीज जोडणी घेतलेली आहे. तसेच ५ एच.पी. जादा भार वाढवून २० अश्वशक्ती केला. तदनंतर दिनांक ११–५–२००४ रोजी ४५ अश्वशक्ती जादा भार मंजूर करून जोडण्यात आला. तसेच जोडणीचे ग्राहक नांव सुशिला पावलू सोज असे बदलणेत आले. या व्यतिरिक्त सदर ठिकाणी जादा ५ अश्वशक्तीचे पावलू मोती सोज यांचे नांवे जादा वीज जोडणी होती, ती जून २००७ मध्ये बंद करण्यात आली. ग्राहकास जून २००७ चे बिलात लोडमॅनेजमेंट चार्जेस मुख्य कार्यालयाचे परिपत्रक क्र. १५१८३ दिनांक २०–५–२००५ नुसार मे २००४ व जून २००४ या महिन्यातील वापराचे ८०% पेक्षा अधिक व ५००

युनिटपेक्षा जादा वापर झालेले युनिटला १०० पैसे / युनिट प्रमाणे असे रू. १९७९५/– लावणेत आले आहेत ते ग्राहास अमान्य आहेत. पैकी रू. १०,०००/– ग्राहकाने दिनांक २७–७–२००५ रोजी भरले. तथापि त्या पुढील बिलामध्ये भरलेल्या रू. १०,०००/– व्यतिरिक्त रक्कम लागून येत राहिली. प्रत्येक बील वादग्रस्त / वादातील रक्कम चालू बिलातून वगळून चालू बील भरणेत येत आहे. दरम्यान ग्राहकाने दिनांक २–६–२००८ रोजी स्वतंत्र अर्जाने महाराष्ट्र वीज नियामक आयोगाकडे याबाबत दाद मागितली आहे. सदर उर्वरीत एलएमसी रक्कमही ग्राहकाने भरली. सदर नाखुशीने भरलेली एलएमसी रक्कम परत मिळावी अशी ग्राहकाची मागणी आहे.

वितरण कंपनीने म्हणणे खालील प्रमाणे मांडले

मुख्य कार्यालय परिपत्रक क्र. १५१८३ दि.२०–५–२००५ नुसार लोड मॅनेजमेंट चार्जेस ग्राहकास त्याचा वीज वापर मे २००४ व जून २००४ चे तुलनेत मे २००५ व जून २००५ मध्ये ५०० किंवा त्यावर वाढला असलेने वरील युनिटला जादा अधिभार रक्कम लावणेत आला आहे. या बाबत इचलकरंजी विभाग यांजकडून उप महाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान) कोल्हापूर परिमंडळ यांचकडे मार्गदर्शन / सल्ला पत्र क्र. आअ/उप वि/महसूल/११४/०३४२१ दिनांक १७–९–२००७ ने मागितले. परंतु त्यास उत्तर मिळाले नाही. या बाबत अधीक्षक अभियंता (कोमं) कोल्हापूर यासही पत्र क्र. ०१४०९ दिनांक २–६–२००७ ने मार्गदर्शन मागितले / सांगितले.



ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, कोल्हापूर परिमंडल, या मंचाचा सदस्य म्हणून मी माझे मत खालील प्रमाणे नोंदवित आहे व त्याचा सर्वार्थाने विचार होणे गरजेचे आहे.

सदर ग्राहक सौ. सुशिला पावलू सोज यांचे पॉवरलूमसाठीचे कनेक्शन आहे. सद्या खात्यावर ६५ एच.पी. इतका लोड आहे. सदर नावांवर दिनांक ११–५–२००४ पासून २० एच.पी. चे कनेक्शन चालू होते. सदरचा २० एच.पी. भार मंजुरीनंतर दिनांक ११–५–२००४ पासून ४५ एच.पी. इतका वाढविला आहे. त्यामुळे तो ६५ एच.पी. इतका झाला. महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने दिलेल्या आदेशाच्या संदर्भाने त्यावेळच्या म.रा.वि.मंडळ, मुख्य कार्यालय, बांद्रा(पूर्व ) मुंबई यांचे परिपत्रक क्र. १५१८३ दि. २०–५–२००८ अन्वये प्रसिध्द केले. त्यात एप्रिल व मे २००४ च्या तुलनेत एप्रिल व मे २००५ मध्ये विजेचा वापर कमी अधिक जादा झाला असलेस ‘ लोड मॅनेजमेंट चार्ज ‘ लावावा व तो ग्राहकाच्या बिलातून वसूल करावा असे निर्देश सदरच्या परिपत्रकात दिले आहेत त्यात आयोगाच्या दिनांक २६–४–२००५ च्या आदेशाचा उल्लेख केला आहे.

सदर ग्राहकास ‘ लोड मॅनेजमेंट चार्ज ‘ ची रक्कम मान्य नाही असे नाही. कारण त्याच एरियात ५ एच.पी. चे आणखी एक पॉवरलूमचे कनेक्शन तकारदाराच्या नातेवाईकांचे आहे. त्या खात्यावर आलेले लोड मॅनेजमेंट चार्जचे बील रू. १९५८/– ग्राहकाने भरले आहे. तक्रारीचा तपशिल बघितल्यास असे लक्षात येते की, ग्राहकाचे एप्रिल २००४ ते ११ मे पर्यंतचा कालावधी व त्यावेळचा २० अश्वशक्तीचा वापर याचा एप्रिल ०५ व मे २००५ मध्ये तुलनात्मक दृष्टीने विचार करून जर वीज वापर एप्रिल २००५ व मे २००५ मध्ये जादा झाला असेल तर आयोगाच्या सूचने प्रमाणे रक्कम घ्यावी अशी ग्राहकाची मागणी असल्याचे दिसते.

यासाठी ग्राहकाने दिनांक १६–७–२००५ चे लोड मॅनेजमेंट यांनी लावलेले बील मिळाल्यापासून सदरचा चार्ज कालावधी व पध्दतीबद्दल दिनांक २७–७–२००५ रोजी उप कार्यकारी अभियंता यांच्याकडे

तक्रार अर्ज दिल्याचे नमूद केले आहे. त्याप्रमाणे दिनांक २८–७–२००५ ला ' लोड मॅनेजमेंट चार्ज ' वजा करून बील (कोटेशन) दिले ते ग्राहकाने दिनांक ३०–७–२००५ रोजी पावती क्रमांक १२४३११५ ने भरल्याचे नमूद केले आहे. उप कार्यकारी अभियंता ' ब ' उप विभाग यांनी ग्राहकांस पत्र क्र. १५०९ दिनांक

२९–३–२००७ ला पत्र पाठवून विभागीय कार्यालयाकडून मार्गदर्शन मागितल्याचे व तो पर्यंत बील भरावे अशा आशयाचे पत्र दिलेले दिसते. विभागीय कार्यालयाने अधीक्षक अभियंता, कोल्हापूर यांचेकडे पत्र क्र. १४०९ दिनांक २–७–२००७ ने मार्गदर्शन मागितल्याप्रमाणे दिसून येते. तसेच उप महाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान) कोल्हापूर यांच्याकडून पत्र क्र. ३४२१ दिनांक १७–९–२००७ ने मार्गदर्शन मागितल्याचे दिसून येते. तथापी दिनांक १७–७–२००५ या १ल्या तक्रार अर्जापासून मंचात तक्रार दाखल होईपर्यंत व त्यानंतरही संबंधिताकडून मार्गदर्शन मिळाले नसल्याचे संबंधित कार्यालयाने पुढील वरिष्ठाशी पत्र–व्यवहार केला नसल्याचे दिसून येते. कंपनीचे मुख्य कार्यालय व त्यानंतर वीज नियामक आयोग यांच्याकडून मार्गदर्शन इतक्या प्रदीर्घ कालावधीत घेतलेले नाही. ग्राहकाने आपली तक्रार अर्ज स्वरूपात दिलेली आहे. तसेच आपले हक्क शाबित होवून सदरचे बीलही ग्राहकाने भरलेले आहे.

अत्यंत तातडीने सदर प्रकरणाचा पाठ पुरावा करून आयोगाकडून मार्गदर्शन घ्यावे त्यानंतर सदर वादातील लोड मॅनेजमेंट चार्ज चे बील व त्यावरील आकारलेले व्याज याचा एकत्रित विचार करावा असे माझे मत आहे.



## सदस्य सचिव व अध्यक्ष यांचे मत

वितरण कंपनीकडून मुख्य कार्यालय परिपत्रक क्र. १५१८३ दिनांक २०–५–२००५ नुसार ज्या वीज ग्राहकाचा वापर मे व जून २००५ महिन्यातील वापर मे २००४ व जून २००४ चे या महिन्यातील वापराच्या तुलनेत ८०% पेक्षा अधिक व ५०० युनिटपेक्षा अधिक असेल त्यांना जादा युनिटला १०० पैसे / प्रति युनिट लागू करणेचा निर्णय आहे. तक्रारदार यांचा भार दिनांक ११–५–२००४ पासून २० अश्वशक्ती त्यापुढे ४५ अश्वशक्ती असा वाढवून घेतला आहे. त्यामुळे परिपत्रकातील अटी त्यांना लागू होतात.

दोन्ही बाजूंची निवेदने, सादर केलेली कागदपत्रें इत्यादी विचारात घेवून सदस्य सचिव व त्यांना असलेले मा. अध्यक्षांचे एक मत असा बहुमताने निर्णय केला आहे तो खालील प्रमाणे आहे.

## **आदेश**

१) तक्रारदार यांना लावणेत आलेले लोड मॅनेजमेंट चार्जेस वि.प.चे परिपत्रकानुसार योग्य असून तक्रारदार यांनी सदर रक्कम भरणा करण्यात यावी.

२) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

३)	या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

(जी. सी. लेले)
सदस्य
ग्राहक तक्रार निवारण मंच,कोल्हापूर

(एस.आर.बांबळे)
सदस्य सचिव
ग्राहक तक्रार निवारण मंच,कोल्हापूर



दोन्ही बाजूंची निवेदने, सादर केलेली कागदपत्रें इत्यादी विचारात घेवून सदस्य सचिव व त्यांना असलेले मा. अध्यक्षांचे एक मत असा बहुमताने निर्णय केला आहे तो खालील प्रमाणे आहे.

तक्रारदार व वि.प. यांनी सादर केलेला पुरावा, त्यांनी सुनावणीचेवेळी केलेले कथन व नमूद केलेली वस्तुस्थिती व महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवाना धारकांच्या कृतींची मानके, विद्युत पुरवठा सुरू करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण) विनियम २००५ मधील तरतुदींचा विचार करून मंच बहुमताने खालील प्रमाणे आदेश देत आहे.